# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## सोमवार, दिनांक १५ एप्रिल, २०२४ / चैत्र २६, १९४६ (शके)

३०. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, अकोला येथील सत्यलढा या खाजगी स्थानिक टी.व्ही. वृत्तवाहिनीने युट्यूब चॅनलवर या वृत्तवाहिनीचे पत्रकार श्री. गणेश सोनावणे, श्रीमती हर्षदा सोनावणे, श्री. अमोल नांदुरकर व श्री. सतिश देशमुख यांनी श्री. अंकुश गावंडे या स्थानिक युवकाला हाताशी धरुन दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी "आमदार मिटकरींसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी आम्हाला हवी असलेली उत्तरे दिली नाही तसेच पत्रकारांनासुध्दा ते उत्तर देऊ शकत नाही, आम्हाला वाटते त्यांच्या मानसिक स्थितीवर परिणाम झाला आहे, त्यांची मानसिक स्थिती खालावली आहे म्हणून आम्ही त्यांचे नाव मनोरुग्णांच्या इस्पितळामध्ये नोंदविले असून त्यांच्या औषध उपचाराचा खर्च शिवशाही फुले आंबेडकर विचारसरणीचे युवक करतील" अशा प्रकरची बिनबुडाची कपोलकल्पित बातमी प्रसारित करुन व जनमानसामध्ये गैरसमज निर्माण करुन सन्माननीय सदस्यांची विधानपरिषद सदस्य म्हणून जनमानसात असलेली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याने सन्माननीय सदस्यांनी सत्यलढा स्थानिक युट्यूब चॅनलचे पत्रकार श्री. गणेश सोनावणे, श्रीमती हर्षदा सोनावणे, श्री. अमोल नांदुरकर, श्री. सतिश देशमुख व श्री. अंकुश गावंडे, स्थानिक युवक यांच्याविरुध्द दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम २५१ मधील तरतूदींच्या अधीनतेने विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे चौकशीसाठी दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी सुपूर्द केली आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १५ एप्रिल, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(५) सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(६) संगणक कक्ष (WEBSITE)